JES Bulletin, 2(3):23-28, July – 2024

# मराठा-ब्रिटिश संघर्षाच्या काळातील स्त्रियांची राजकीय स्थिती - एक चिकित्सक अभ्यास (1772-1818)

**संशोधक विद्यार्थीनी**
**राणी नानासाहेब मतसागर**

**संशोधन मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. विलास श्रीरंग जाधव**
(इतिहास विभाग प्रमुख)
जे. इ. एस. कॉलेज, जालना

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृती स्त्रियांचा सन्मान करणारी म्हणून समजली जाते. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे राज्य स्थापन केल्यानंतर जवळपास दीडशतक पर्यंत मराठ्यांची सत्ता महाराष्ट्रात असल्याचे दिसून येते. मराठा सत्तेचे नेतृत्त्व पुढे छत्रपतींचे प्रधान असलेल्या पेशव्यांकडे गेले. सुरूवातीच्या चार पेशव्यांनी मराठा सत्तेचा विस्तार घडवून आणून संपूर्ण भारतात मराठ्यांचा दबदबा निर्माण केला. 'अटकेपार झेंडे' असा जो अभिमानाने उल्लेख केला जातो तो या काळातच. प्राचीन काळापासून भारतीय स्त्रियांचा राजकारणात सहभाग असल्याचे दिसून आलेले आहे. मध्ययुगीन काळातही राजकारणात स्त्रियांचा सहभाग होता. मराठा राजकारणातही स्त्रियांनी आपली कर्तबगारी सिद्ध केली होती. जिजाबाई, येसूबाई, ताराबाई यासारख्या स्त्रियांनी मराठा राज्यकारभारात आपले योगदान दिलेले होते. उत्तरपेशवाईच्या काळातही कर्तबगार स्त्रियांनी राजकारणात आपले अस्तित्त्व सिद्ध केले होते.

**उद्दिष्ट्ये :**

1. मराठा साम्राज्याच्या प्रशासनातील महिलांचा अप्रत्यक्ष सहभाग अभ्यासणे.
2. पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांनी राजकारणात आपले वर्चस्व निर्माण करताना केलेल्या संघर्षाचे अध्ययन करणे.
3. मराठा साम्राज्याच्या पतनाच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांची भूमिका आणि त्यांच्यावर झालेला परिणामांचा आढावा घेणे.
4. ब्रिटिशांचे मराठी सत्तेत आगमण व पेशवेकालीन स्त्रियांची त्यावरील प्रतिक्रिया अभ्यासणे.

 ISSN: 2584-2072 (online)

**1. राजस्त्रियांचा राजकारणातील सहभाग :**

भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान संस्कृती म्हणून ओळखली जाते. त्यामुळे राजकारणातही गादीचा वारसा हा पुरूषांकडेच जात होता. राज्यकारभाराची प्रत्यक्ष सुत्रे कधी स्त्रियांकडे, मुस्लिम स्त्रियांच्या संदर्भात मध्ययुगीन काळात रझिया सुल्तान हीने स्वतंत्र्यपणे पूर्णाधिकारी म्हणून राज्यकारभार बघितला होता. मुस्लिम स्त्रियांमध्ये नुरजहाँ, चाँदबिबी या सारख्या स्त्रियांनी आपली कर्तबगारी सिद्ध केली होती. मात्र त्यांचे कार्य राजमाता स्वरूपात होते. राजमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई यांचे कार्य देखील राजमाता स्वरूपातच होते. त्यांनी सर्वस्व राजसत्तेवर अधिकार म्हणून सत्ता सांभाळली नव्हती. उत्तरपेशवाईच्या काळामध्ये पेशव्यांच्या घरामध्ये कर्तबगार पेशव्यांचा एकापाठोपाठ मृत्यू ओढावला गेलेला होता. अशावेळी पेशव्यांच्या घरातील सर्वात श्रेष्ठ व्यक्ती या नात्याने नानासाहेब पेशव्यांची विधवा गोपिकाबाई यांना महत्त्व प्राप्त झाले होते. मराठ्यांचा उत्कर्षकाळ आणि पानिपतसारखी लढासई गोपिकाबाईच्या कारकिर्दीतच घडली होती. नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर गोपिकाबाई शनिवाड्याच्या राजकारणापासून दूर गंगापुरास जाऊन राहिल्या. परंतु पुण्याच्या राजकारणावर तिथून लक्ष होते. सवाई माधवराव चौदा-पंधरा वर्षाचे असताना  त्यांना गोपिकाबाईच्या भेटीसाठी पाठविण्यात आले तेव्हा गोपिकाबाईनी पेशव्यांच्या संगोपन व्यवस्थेविषयी नाराजी व्यक्त केली. पेशव्याच्या भेटीवर प्रतिबंध घातल्यामुळे त्यांस शहानपन कधी यावे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता.[1]

सवाई माधवरावाच्या शिक्षणासंबंधीत त्यांनी लिहिलेले पत्र म्हणजे पेशव्याच्या शिक्षणसंबंधाने आणि दिनचर्यासंबंधाने घालून दिलेला वस्तूपाठच होता. त्यांनी या पत्रातून तेरा कलमी उपदेश केला आहे. यातून गोपिकाबाईच्या एकूण राजकारभाराच्या अनुभवाची आणि ज्ञानाची प्रचिती मिळते. या पत्रात त्यांनी पेशव्याचे शिक्षण कसे असावे ते कोणी कसे द्यावे, दिनचर्या कशी असावी, पेशव्याचा व्यायाम, पूजा, कुस्ती, खुराक, सेवकाची नेमणूक त्यांच्याशी वागणूक, भोजन, अभ्यास, शास्त्रे, गणित इ. सर्व बाबींच्या सूचना  त्यांनी पत्रातून स्पष्ट केल्या आहेत.[2] पे पेशव्यांकरिता मार्गदर्शक तत्त्वेच ठरली होती. गंगाबाईनेही म्हणजेच गोपिकाबाईनी प्रत्यक्षात राजकारणात सहभाग न घेता मार्गदर्शकाची भूमिका केली होती. राजकारणाचा मोठा अनुभव पाठीशी असल्यामुळे त्यांना राजकारणाची खोल स्वरूपाची जाण होती.

कोल्हापूरच्या जिजाबाईंचे महाराणी आणि राजमाता म्हणून उत्तरपेशवाईच्या काळात त्यांचे कार्य आणि कर्तृत्त्व दिसून येते. कागलचे राणोजी घोरपडे आणि पेशव्याच्या आत्याबाई थोरल्या बाजीरावच्या भगनी असलेल्या अनुबाई घोरपडे यांना त्यांनी नियंत्रित ठेवले होते.[3]

कोल्हापूरचे छत्रपती संभाजी साताऱ्याचे छत्रपती होऊ इच्छित होते. परंतु त्यांची ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. नानासाहेबांनी याबाबात दिलेले वचन पाळले नाही, तेव्हा छत्रपती संभाजी साताऱ्यावर आक्रमण करण्याचा विचार करत होते. परंतु जिजाबाईंनी पेशव्यांचा आणि संभाजीरावांचा सलोखा कायम राखण्यास त्यांना प्रवृत्त केले व साताऱ्यावर आक्रमण करण्यापासून त्यांना थांबविले. त्यांचा करारीपणा त्यांच्या धाडसी कर्तृत्त्वावरून दिसत होता.

बालशिवाजीच्या राज्यरोहणानंतर जीजाबाईंनी भगवंतराव अमात्य यांना काही काम सांगितले होते. अमात्यांनी त्यांना 'स्त्री बुद्धी अशाश्वत' असे उदगार काढले व हे काम आपणाकडून होणार  नाही असे सांगितले तेव्हा जिजाबाईंनी अमात्यास कळविले. 'आपण काम न कराल तर मोठीशी अडाचन पडेल समजू नये ते काम य: कश्चित कुणबींकडून चालविता येईल. संभाजीराजांच्या मृत्युनंतर त्यांनी मेघडंबरी उभारण्याचा प्रश्नही त्यांनी खंबीरपणे हाताळून प्रसंगी शंकराचार्यांचा विरोधही जुमानता नाही. ब्रिटिशांच्या वाढत्या शक्तीचा धोका त्यांनी ओळखला होता. ब्रिटिशांना वेळीच आवर घालणे गरजेचे आहे असे त्यांनी स्पष्ट मत मांडले होते.

'कोवळा मोड आहे तो मोडल्याने उत्तम

भारी जाहलेने सर्वात वाईट'[4]

असे उदगारा ब्रिटिशांविषयी जिजाबाईंनी काढले होते. ब्रिटिश भारतावर आपली सत्ता स्थापित करणार हे जिजाबाईंना तेव्हाच समजले होते. एकूणच जिजाबाईंची मुत्सद्देगिरी बघितल्यास महाराणी तसेच राजमाता म्हणून त्यांचे कार्य मोलाचे आहे. पेशवाईच्या उत्तरार्धात रघुनाथरावाची बायको आनंदीबाई राजकारणात असल्याचे दिसून येते. बाजीराव दुसऱ्याला लष्करी शिक्षणासोबतच राजकीय शिक्षणही मिळावे अशी आनंदीबाईची इच्छा होती. बाजीरावाला केवळ व्रतवैकल्यातच गुंतवून टाकल्याबाबत तिने खंत व्यक्त केली होती. आनंदीबाईच्या इच्छेप्रमाणे बाजीरावास शिक्षण मिळाले असते तर मराठ्यांचा इतिहास हा वेगळा राहिला असता.

आनंदीबाई विलक्षण धुर्त व चाणाक्ष होती. तिने सखाराम बोकीलास लिहिलेल्या एका पत्रात तिची धुर्तता स्पष्ट होते. या पत्रात इंग्रज असे या देशात पाय प सरवत आहे. ते लखनौच्या शुजाउद्दौलाच्या आणि अर्काटच्या महमंदअलीच्या बाबत इंग्रज कसे वागले हेही या पत्रात सांगितले. इंग्रजांचा कावा ओळखूनही राघोबादादांच्या कृत्याचे ती समर्थन करते. सखाराम बाबुंना त्या म्हणाल्या 'म्हातारपणी ब्राह्मणी दौलत इंग्रजांच्या घरात घातली हे अपयश आपल्या माथी घेऊ नका'[5] यावरून आनंदीबाई या दुरदृष्टीच्या असल्याचे दिसते. नागपूर राज्यात काही कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या त्यात जाणोजी भोसल्याची विधवा दर्याबाई ही एक होती यांचाही राज्यकारभारात अप्रत्यक्षपणे सहभाग होता. कोकणातील ब्रह्मेंद्रस्वामी शाहू महाराजांच्या शन्यासोबत कोकणच्या संदर्भात राजकीय मसलत करीत साताऱ्च्या छत्रपतींनी पेशव्यांच्या विरोधात बंड पुकारले. त्यावेळी छत्रपतींच्या राजकुटुंबातील स्त्रियांनी तऱ्हाच्या बोलणीसंदर्भात झालेल्या चर्चेत सहभाग नोंदविला होता.[6]

जत संस्थानाचा कारभार यशस्वीपणे सांभाळण्यात स्त्रियांचाही मोठा वाटा होता. सावंतवाडीचे खेमसावंत यांना पुत्र नव्हता त्यांनी आपल्या निधनापूर्वी आपल्या संस्थानाचा कारभार आपली पत्नी लक्ष्मीबाई हिच्या स्वाधीन केला होता. कोल्हापूरकरांशी टक्कर देऊन मोठ्या मुत्सद्देगिरीने व शौर्याने लक्ष्मीबाईने सावंतांचे राज्य राखले. स्त्रिया परगाव्याच्या प्रशासनातही सहभाग घेत असत. शासन कर्त्यांचा निधनानंतर जर ते निपुत्रिक मरण पावले असतील तर त्यांच्या घरातील विधवांचा राजकीय सहभाग वाढत होता. प्रसंगी रखेल स्त्रियांचाही सहभाग आढळतो. महादजी शिंदेची एक केशरी नामक रखेल स्त्री होती. तिचा राजकीय मंत्रणेत सहभाग आढळतो.[7]

एकंदरीत पेशवाईतील राजस्त्रिया राजकारणात आपला सहभाग, मार्गदर्शकाच्या भूमिकेतून तसेच समन्वयकाच्या भूमिकेतून मांडल्याचे दिसून येते.

**2. उत्तरपेशवाईतील स्त्रियांचा युद्धामधील सहभाग :**

उत्तरपेशवाईच्या काळात कोल्हापूरच्या महाराणी जिजाबाई युद्धात प्रत्यक्ष भाग घेत असल्याचे उल्लेख आहेत. संभाजी राजे यांच्या हयातीत त्यांनी काही लढ्यांत भाग घेतला होता.[8] राघोबादादा बारभाईच्या हातून निसटल्यावर कारभाऱ्यांनी आनंदीबाईस पकडण्याचे प्रयत्न केले. तेव्हा तिने घरप्रांतात फौज उभारून दंगे आरंभ केले. मिसेस जेम्स हॉल नावाच्या एका युरोपियन स्त्रीने पुण्यात

स्त्री पलटण उभारण्याचा प्रयत्न केला. ती ज्या पद्धतीने पुरूषी लष्करी ढ्रेष परिधान करीत होती. त्यावरून तिच्या नावास साधर्म्य असणारे जमालखान हे नाव मिळाले होते. 1788 मध्ये ती पुण्यात आली होती.[9] थोडक्यात पेशवाईच्या काळात स्त्रियांनी प्रसंगानुसार लष्करी कारवाईत तसेच युद्धातही आपला सहभाग नोंदवला होता.

**3. उत्तराधिकारी निवडीतील स्त्रियांची भूमिका :**

राजघराण्यातील विधवांना आपला उत्तराधिकारी वारस व दत्तक निवडण्याचे अधिकार होते. नागपूरकर भोसल्यांच्या घराण्यात जाणोजी भोसले हे निपुत्रिक होते. त्यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून मुधोजीचा मुलगा रघुजी दुसरा यास दत्तक घेण्याचे ठरविले होते. रघुजी सज्ञान होईपर्यंत नागपूर राज्याचा कारभार आपल्या हाती राहावा असे साबाजीला वाटत होते. परंतु या सर्व बाबींची भूमिका दर्याबाई पार पाडत होती.[10]

कोल्हापूरच्या संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी कोल्हापुरच्या गादीवर उमाजी भोसले मुंगीकर घोरपडे ह्या बाळाजी विश्वनाथच्या कन्या. त्यांनीही पेशव्यांना मदत करण्याचे धोरण स्विकारले. हे प्रकरण जिजाबाईंनी अतिशय चतुरबुद्धीने हाताळले. थोडक्यात उत्तराधिकारी निवडीच्या प्रसंगात पेशवाईच्या उत्तरकाळातील स्त्रियांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

**निष्कर्ष :**

मराठा-ब्रिटीश संघर्षाच्या काळात राजास्त्रियांचा राज्यकारभारात सहभाग व ब्रिटिश नितीचा त्यांना लागलेला सुगावा हे या पेपरच्या माध्यमातून स्पष्ट होते. पेशवेकालीन महिलांना प्रत्यक्षपणे राज्यकारभारात आपला सहभाग नोंदवता आला नाही परंतु मार्गदर्शकाची तसेच समन्वयकाची भूमिका स्त्रियांनी नोंदवलेली दिसून येते. राजकारणात काही स्त्रिया वावरतांना दिसतात. मात्र त्या स्वतंत्र्यपणे राजकारण करतांना दिसत नाहीत. कोणाची तरी राणी म्हणून, राजमाता म्हणून, राजघराण्यातील राजस्त्री म्हणून त्यांना अशाप्रकारची संधी प्राप्त झाली आहे. इंग्रजांचा कावा ओळखणारी स्त्री या काळात दिसून येते. ज्या स्त्रिया राजकारणात आल्या त्यांनी कोणत्याही प्रकारे दबावाला बळी न पडता अत्यंत खंबीरपणे राजकारण केले. राजकारणाला हवे तसे वळण देण्यात यशस्वी झालेली तसेच कोणत्याही परिस्थितीत न डगमगणारी स्त्री या काळात दिसून येते.

**संदर्भ :**


1. वैद्य सुमन, अखेरचा पेशवा, प्रगती प्रकाशन 87 अंधतोल नागपूर, प्रथमावृत्ती, 1994, पृ. क्र. 18.
2. सरदेसाई गोविंद सखाराम, ऐतिहासिक पत्रबोध, गिरगाव मुंबई, 1939, पृ. क्र. 115.
3. गर्गे सदाशिव मार्तंड, करवीर रियासत गो. य. राणे प्रकाशन, पुणे, 1968, पृ. क्र. 191.
4. कित्ता उपरोक्त, पृ. क्र. 218
5. सरदेसाई, मराठी रियासत खंड-6, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. क्र. 119.
6. सरदेसाई गो. स., मराठी राज्याची अखेर, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, 1934, पृ. क्र. 10.
7. खरे वासुदेव गोविंद, नाना फडणीसाचं चरित्र, 1927, पृ. क्र. 180
8. गर्गे सदाशिव, उपरोक्त, पृ. क्र. 192
9. सरदेसाई, मराठी राज्याची अखेर, पृ. क्र. 339
10. गुप्ते काशीराव राजेश्वर (संपा), काळे यादव माधव, नागपूरकर भोसल्यांची बखर, पृ. क्र. 131.